
संयुक्त राष्ट्राची
अन्न
आणि
कृषि
संघटना

# जबाबदारीपूर्ण मासेमारीसाठी कोणती आचार संहिता आहे ?



# जबाबदारीपूर्ण
# मासेमारीसाठी
# कोणती
# आचार संहिता
# आहे ?

संयुक्त राष्ट्राची अन्न आणि कृषि संघटना
रोम २००१

या सूचिकेच्या उपयुक्त प्रस्तुतिकरणामध्ये अशा कोणत्याही विचारांना प्रस्तुत केले गेलेले नाही, जे संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेचा संबंध, कायदेशीररित्या, कोणत्याही देश, परिक्षेत्र, शहर आणि क्षेत्र किंवा यांच्या अधिकृत सीमाक्षेत्र वा सीमेशी संलग्नित आहे.

ISBN 92-5-104541-0

सर्वाधिकार सुरक्षित, शैक्षणिक आणि गैर व्यवसायिक उद्देशांसाठी या सूचनेत दिलेल्या माहिती चे पुनः निर्माण आणि प्रसार कापीराईट अधिका-याच्या कोणत्याही पूर्व लिखित परवानगीशिवाय केले जाऊ शकते, परंतु त्यामध्ये या स्रोताचा उल्लेख करणे आवश्यक आहे. या सूचनेचा व्यवसायिक उद्देशासाठी उपयोग कापीराइट अधिका-याची परवानगी घेतल्याशिवाय करण्यास मनाई आहे. परवानगीसाठी पुढील पत्त्यावर आवेदन करावे. Chief, Publishing and Multimedia Service, Information Division, FAO, Viale delle Terme di Caracalla. 00100 Rome, Italy किंवा E.mail चा पत्ता - Copyright@fao.org

©FAO 2001

# जबाबदारी पूर्ण मासेमारीसाठी कोणती आचार संहिता आहे ?

मात्स्यिकी (ज्यात मत्स्य व्यवस्थापन, मासे पकडणे, त्यावरील प्रक्रिया, साठविलेल्या माशांची विक्री अंतर्भूत आहे) आणि जलीय संवर्धन (जलकृषी / मासे पालन) जगातील लोकांसाठी अन्न, रोजगार, उत्पन्न आणि पुर्ननिर्माणाचे महत्वपूर्ण साधन आहे. आज लाखों लोकांचे जीवन माशांवर अवलंबून आहे. जर येणा-या पिढीसाठी पुरेशा माशांच्या नैसर्गिक साठयाची उपलब्धता टिकवून ठेवावयाची असेल तर, मत्स्य व्यवसायाशी निगडित प्रत्येक व्यक्तीने जगातील मत्स्य व्यवस्थापन आणि मत्स्य साठयांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या 170 हुन अधिक सदस्यांनी जबाबदारीपूर्ण मासेमारीसाठी सन् 1995 मध्ये आचारसंहिता स्वीकारली. ही संहिता सक्तीची नसून ऐच्छिक आहे आणि मात्स्यिकी व जल संवर्धन यापैकी संबंधित (समुद्रीय अथवा अंतर्भूत क्षेत्रातील) व्यक्तीकडे संकेत करते. ही संहिता ऐच्छिक असल्याने हे महत्वाचे आहे की मासेमारीत व जलीय संवर्धनात कार्य करणारे त्याच प्रमाणे जलीय संवर्धनाशी निगडीत व्यक्ती या संहितेच्या व्यवहारिक बाजू आणि प्रमुख उद्देश्याच्या प्राप्तीसाठी या संहितेची अंमलबजावणी करण्यासाठी बांधिल असावी.

हया संहितेतील मुलतत्वांना, सिद्वांतांना, ध्येयाला अमलात आणण्यासाठी व विस्तारासाठी कृषी संघटनेला खुप श्रम घ्यावे लागले व यासाठी दोन वर्षाहून अधिक काळ लागला. अन्न आणि कृषी संघटनेचे प्रतिनिधी आंतरशासकीय संघटना, मात्स्यिकी आणि मत्स्य उद्योग व त्याच्यांशी निगडित असलेल्या अशासकीय संघटनांना या संहितेच्या करारापर्यंत पोहोचण्यासाठी अत्याधिक परिश्रम घ्यावे लागले. हे सर्व मात्स्यिकी आणि जलीय संवर्धनामध्ये गुंतलेल्या लोकांच्या प्रयत्नामुळेच शक्य झाले आहे. या संबंधीची ही आचार संहिता मात्स्यिकी आणि जलकृषी मुद्दयाच्या करारावर मोठया प्रमाणात जागतीक जागरुकतेचे प्रतिनिधित्व करते.

उद्योग आणि मात्स्यिकी समुदायाच्या मदतीने ही संहिता लागू करण्याची जबाबदारी सरकारची आहे. अन्न आणि कृषी संघटनेची भूमिका त्यांच्या कार्यक्रमांना तांत्रिक मदत करण्याची आहे. परंतु याच्या अंमलबजावणीची थेट जबाबदारी अन्न आणि कृषीं संघटनेवर नाही. कारण राष्ट्रीय मात्स्यिकी योजनांच्या अंमलबजावणीची व विकासाची जबाबदारी अन्न आणि कृषी संघटनेवर नसून त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर असते.

जेव्हा सरकार यातील सिद्धान्त आणि उद्देश्यांना राष्ट्रीय मात्स्यिकी योजना आणि कायदा पद्धतींसाठी सामिल करेल, तेव्हाच या संहितेची अंमलबजावणी अधिक प्रभावकारी होऊ शकेल. या योजना आणि कायदयांच्या बदलांना पाठिंबा आहे हे नक्की करण्यासाठी, या संहितेला पाठिंबा आणि यांचे स्वेच्छिक अनुपालन करण्यासाठी व उद्योगधंदे आणि इतर समुहांशी सल्ला मसलत करण्यासाठी सरकारने पाऊले उचलली पाहिजेत. याबरोबरच शासनाने मच्छिमार समुदायाला व त्यांच्याशी निगडीत उद्योगांना संहितेच्या पूर्ण विकासासाठी प्रोत्साहन देऊन मदत केली पाहिजे जेणेकरुन या आचार संहितेच्या उद्देश्याची पूर्ति होऊ शकेल. ही संहिता अमलात आणून याचा विकास करण्याचा दूसरा मुद्दा म्हणजे ही संहिता पूर्णपणे लागू केली पाहिजे.

या पुस्तिकेचा उद्देश्य आचारसंहितेच्या काही महत्वपूर्ण मुद्दयाच्या गैर तांत्रिकी वर्णनावर आहे.. अशी आशा केली जाते की हया संहितेतील सूचना या उद्देश्याच्या पूर्तीसाठी जनतेत जागरुकता आणतील आणि मत्स्य व्यवसाय क्षेत्रांमध्ये याची अंमलबजावणी करण्यास मग तो विशाल किंवा लघु व्यवसाय असो अथवा जलकृषीचा असो, यास प्रोत्साहन देईल. ही पुस्तिका आचार संहितेच्या बदल्यात नाही. परंतु साधारण रुपात यात असलेली अधिक माहिती मदतीसाठी मिळवून देण्यास हिचा उपयोग होईल.

या संहितेचे अन्न आणि कृषी संघटनेने पुढील पाच भाषांमध्ये भाषांतर केले आहे. त्या म्हणजे अरेबियन, चाइनीज, इंग्लीश, फ्रेंच आणि स्पॅनीश. या बरोबरच शासनाने व अन्य औद्योगिक समुहांनी देखील गैर शासकीय रुपात अल्बेनियन, क्रोएशियन इस्टोनियन, फारसी, जर्मन, आइसलैंडीक, इन्डोनेशियन, इटालियन, जपानी, पोलिश, रशियन, सिंहली, स्लोवेनियन, तमिल, थाई आणि तिग्रीना अशा अनेक भाषांमध्ये देखील भाषांतर केले आहे. अन्न आणि कृषी संघटनेने या भाषांतरातील काही भाग इंटरनेट मात्स्यिकी विभाग वेबसाइट वर उपलब्ध करुन दिला आहे.

जे आचार संहिते बद्दल अधिक माहिती घेऊ इच्छितात किंवा याच्या भाषांतरित भागाच्या प्रती उपलब्ध करु इच्छितात ते अन्न आणि कृषी संघटनेच्या मात्स्यिकी विभागाच्या वेबसाइट वरुन माहिती घेऊ शकतात. यासाठी पुढील पत्त्यावर संपर्क करावा -

http://www.fao.org/fi/agreem/codecond/codecon.asp.

जर आपण इन्टरनेटशी संपर्क करु शकत नसाल तर या पत्त्यावर संपर्क करावा. दि चीफ ऑफ सर्विस, एफआईपीएल/फिशरिज डिपार्टमेंट, फुड ॲण्ड एग्रिकल्चर ऑर्गेनाइजेशन, वियाले डेल टर्मी डी काराकल्ला, 00100 रोम, इटली. प्रतिलिपि साठी पाकिटावर आपणास अरेबिक, चाइनीज, इंग्लिश, फ्रेंच किंवा स्पेनिश यांपैकी कोणत्या भाषेत संहिता पाहिजे हे कृपया स्पष्ट करावे.

## पार्श्वभूमि


ज्यावेळेस मात्स्यिकी आणि जलकृषीशी संबंधित देशांमधील जनता या आचार संहितेचे पालन करत याच्या संरक्षणाचा आणि व्यवस्थापकीय संसाधनाचा विचार करेल, तेव्हाच आपण आपल्या येणा-या पिढीला पुरेश्या प्रमाणात मासे उपलब्ध करण्याचे आश्वासन देऊ शकू. मत्स्य व्यवसायाशी संबंधितांनी माशांच्या संचयनाचे प्रमाण आणि मासेमारी या दोन्ही गोष्ठी वर्तमानात आणि भविष्यात देखील लक्षात ठेवाव्यात. *अधिकाधिक निरंतर उत्पादन* हा शब्द मासेमारीचे प्रमाण दर्शवितो. याचाच अर्थ असा होतो की कोणत्याही देशातील मत्स्य व्यवसायाची प्रक्रिया आणि योजना निर्धारण, मत्स्य व्यवसाय संसाधनाच्या दूरवरच्या निरंतर प्राप्तीला लक्षात घेऊनच केली पाहिजे. मच्छिमार समुदायाची गरीबी कमी करण्यासाठी मत्स्य संसाधनाच्या संरक्षणाचे आणि निरंतर अन्न पुरवठण्याचे आश्वासन दिले जावे.

म्हणूनच जे देश आणि ज्या देशांचा समूह मात्स्यिकी व जलकृषीचा विकास करु इच्छितो, त्याला मदत करण्याचा या आचार संहितेचा खरा उद्देश्य आहे.

मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी पैसा, कुशलता आणि अनुभवाची गरज असणे हे सर्वज्ञात आहे. जी नेहमी विकासशील देशांमध्ये आहे आणि जी खास करुन अविकसनशील देशांमध्ये व छोटया द्विपीय देशांमध्ये नसते, अशा देशांना आपल्या मत्स्य जलकृषीसाठी राष्ट्रीय क्षमतेच्या विकासामध्ये सहकार्य करण्यास अन्न आणि कृषी संघटनेसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेला ही आचार संहिता प्रोत्साहित करते.

या संहिते मध्ये मासेमारीचे योग्य व्यवस्थापन कसे करावे या प्रमाणेच मासेमारी कशी संचालित करावी, याचे वर्णन केलेले आहे. तसेच, ही संहिता मासेमारी व त्याची विक्री, जलकृषीचा विकास आणि इतर किनारपट्टीवरील उपक्रम यांच्यातील परस्पर संबंधांविषयी भाष्य करते. या संहितेत मासेमारीमध्ये एका देशाचे दूस-या देशाशी सहकार्य केवढे महत्वाचे आहे यावर प्रकाश टाकला आहे.

मत्स्य पालकांनी, मत्स्य उद्योगांनी आणि सरकारनी ही संहिता कोणत्या क्रमाने अमलात आणावी हे या आचार संहितेमध्ये सविस्तरपणे सांगितले नाही आणि म्हणूनच अन्न आणि कृषी संघटना, या संहितेला लागू करण्यासाठी एक विस्तृत मार्गदर्शिका तयार करण्यात प्रयत्नशील आहे. या मार्गदर्शिकेचा खरा उद्देश मत्स्य पालकांना, उद्योग आणि मत्स्य व्यवस्थापकांना व्यावहारिक आणि तांत्रिक सल्ला देण्याचा आहे. ज्याने हे निश्चित होईल की ज्यासाठी ही संहिता तयार केली आहे त्यासाठीच ख-या अर्थाने हिचा उपयोग केला जाईल.



## मात्स्यिकी व्यवस्थापना

मात्स्यिकीतील सुसंघटित व्यवस्थापनेमध्ये देशांची स्पष्ट आणि सुसंघटित मत्स्य योजना असावी याचे संहिता समर्थन करते. मासेमारीची आवड असणा-यांबरोबरच मत्स्य उद्योग, मत्स्य व्यवसायांशी कार्यरत, पर्यावरण समूह आणि मत्स्य व्यवसायाशी संलग्नित असलेल्या सर्व संघटनांच्या सहकार्यानेच या योजनांमध्ये विकास होऊ शकतो.

मत्स्य संसाधन हे अनेक देशात विभागले गेले असल्याने या देशांमधील मत्स्य व्यवसायात सुरक्षितता आणि व्यवस्थापनांसाठी सहयोग आवश्यक आहे. नवीन विभागीय, क्षेत्रीय मत्स्य संघटन स्थापन करण्यासाठी किंवा वर्तमान संघटनांमध्ये मजबूती आणण्यासाठी ही संहिता आवाहन करते. या पुस्तिकेच्या सुरवातीच्या भागातील चर्चित, दूरगामी ध्येय प्राप्त करण्याचा, सहकार्य हाच एक वास्तविक मार्ग आहे. क्षेत्रीय मासेमारीतील संघटनेच्या भूमिकेचा साधक-बाधक विचार पुढील क्षेत्रीय तसेच अंतरराष्ट्रीय सहकार्यासंबंधीच्या भागात केला गेला आहे.

सर्व स्तरांतील मत्स्य उद्योगांनी स्पष्ट मत्स्य व्यवसाय व्यवस्थापन आणि कायदेशीर रुपरेषेत मत्स्य व्यवसाय चालविणे महत्वाचे आहे. कारण मत्स्य व्यवसायाशी निगडीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला सर्व नियमांचे पालन करण्याची स्पष्ट माहिती असावी.

पर्यावरणावर मत्स्य व्यवसायाचा आणि मत्स्य व्यवसायाच्या पद्धतीचा कमीत कमी दुष्परिणाम होऊन पकडलेल्या माशांतील अनावश्यक भाग कमी करुन मासळीचा दर्जा सुरक्षित ठेवला जाईल, यासाठी मत्स्य व्यवसायिकांनी खात्रीपूर्वक व्यवस्थापन केले पाहिजे. मत्स्य व्यवसायिकांनी आपापल्या मत्स्य व्यवसायाची नोंद करुन ठेवावी. नियमांचे पालन व्हावे म्हणून सरकारने अमलात आणण्याजोगे कायदे लागू केले पाहिजेत व जो या कायदयांचे उल्लंघन करेल त्याला दंड केला पाहिजे किंवा कायदयांच्या उल्लंघना पासून नुकसान होऊ नये म्हणून त्यांच्या कडील मासेमारीचा परवाना जप्त केला पाहिजे.

मात्स्यिकी धोरणांचा विकास करताना त्यातील मुद्दयांचा काळजीपूर्वक विचार करणे महत्वाचे आहे. यात इतर बाबींबरोबरच मत्स्य व्यवसायातील मूल्य निर्धारण व मासेमारीचे फायदे आणि मासेमारीवर पर्यावरणाचा व समाजाचा होणारा प्रभाव सामिल असावा.

प्रत्येक देशाने धोरण तयार करताना पारंपारिक मत्स्य व्यवसाय आणि उपलब्ध सर्वोत्कृष्ट शास्त्रीय माहिती याची योग्य सांगड घालणे अत्यावश्यक आहे. ज्या देशांमध्ये पूर्णतः शास्त्रीय माहिती उपलब्ध नसेल, त्यांनी मत्स्य व्यवसायाच्या संबंधी आराखडे आखताना काळजी घेणे आवश्यक आहे.

मत्स्य व्यवसायाशी निगडीत सर्व लोकांनी व संघटनांनीं एकत्र येऊन मासेमारीच्या मुद्दयांवरील आपली मते व विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी एकमेकांस प्रोत्साहित करणे जरुरी आहे. मासेमारीवर अवलंबून असलेल्या स्थानीय लोकांच्या गरजांवर खास

करुन लक्ष केन्द्रित करण्याची आवश्यकता आहे. देशांनी मासेमारी व मत्स्यशेती करणा-यांना योग्य शिक्षण तसेच प्रशिक्षण दयावे, ज्यामुळे मासेमारीच्या योजनांचा विकास होऊन अशा धोरणांच्या अंमलबजावणीसाठी भविष्यात देखील अशा व्यक्तींचा खात्रीने सहभाग होऊ शकेल.

मत्स्य संसाधनांचे रक्षण करण्यासाठी सर्व देशांनी विस्फोटक विषारी वस्तुंचा उपयोग टाळावा. तसेच इतर मत्स्य नाशक वस्तुंच्या प्रयोगांवर प्रतिबंध घालावा.

प्रत्येक देशांनी असे सुनिश्चित केले पाहिजे की आपापल्या जलक्षेत्रात फक्त मासेमारीच्या जहाजांनाच मासेमारीसाठी प्रवेश दिला गेला पाहिजे. या प्रकारची मासेमारी प्रत्येक देशांचे नियम-अधिनियम आणि कायदे जबाबदारीपूर्ण लागू करुनच केली गेली पाहिजे.

प्रमाणाबाहेर (अधिक मासेमारीने भविष्यात मत्स्य भंडाराचा नाश होऊ नये म्हणून) होणारी मासेमारी टाळण्यासाठी व माशांच्या नैसर्गिक प्राप्तीसाठी मासेमारी करण्या-या जहाजांच्या समूहाचा आकार मोठा नसावा. या बरोबरच मासेमारीची नवीन साधने उपयोगात आणण्यापूर्वी त्यांचा पर्यावरणावर होणारा प्रभाव जाणून घेतला पाहिजे (उदाहरणार्थ - प्रवाळीय खडक व इतर जीवांवर परिणाम होऊ नये म्हणून) मासेमारीची पद्धत व साधनांची निवड उत्कृष्ट असावी. ज्या समुद्री जीवांची व अनावश्यक माशांच्या जातींची संख्या लोप पावत चालली आहे असे जीव मासेमारीच्या साधनांमध्ये अडकू नयेत म्हणून योग्य प्रकारची साधने निवडली गेली पाहिजेत. मासेमारीची साधने व पद्धती योग्य नसतील आणि हयामुळे मोठया प्रमाणावर अन्य जीवांचे नुकसान होत असेल, तर अशा साधनांचा किंवा पद्धतींचा वापर करु नये.


अशा मासेमारीच्या साधनांची (उपकरणे) खरेदी केली जावी की ज्यापासून कमीत कमी प्रमाणात अपव्यय होईल. जहाजांतून टाकलेल्या अनावश्यक वस्तुंमुळे अधिक प्रमाणात प्रदूषण होणार नाही याची मासेमारीच्या जहाजाच्या मालकांनी व कामगारांनी काळजी घ्यावी.

हवेच्या दर्जाची उत्कृष्टता राखण्यासाठी, मत्स्य व्यवसाय करणा-या देशांनी अशी मार्गदर्शक सूत्रे अंगिकारीली पाहिजेत की ज्यामुळे मासेमारी जहाजातील विषारी वायू आणि ओझोनचे प्रमाण कमी करणा-या पदार्थांचा उपसर्ग होऊ नये अशा पदार्थांचा वापर टाळण्यात यावा.

माशांची जन्मस्थाने, (उदा आर्द्र भूभाग, कांदल वने (Mangrove), समुद्रीय खडक व लगून) यांचा प्रदूषणामुळे होणारा नाश टाळणे अत्यावश्यक आहे. ज्या देशांमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे होणारा मत्स्य संसाधनाचा नाश अपरिहार्य आहे, अशा देशांनी संसाधनाच्या संरक्षिततेसाठी आणि व्यवस्थापनेसाठी आणीबाणीच्या परिस्थितीत सुद्धा त्वरित सज्ज असावे.

## फ्लॅग कंट्रीस

ज्या देशांमध्ये आपल्या हद्दीबाहेरील पाण्यात मासेमारी करणारी जहाजे आहेत अशा जहाजांना योग्य प्रकारचा परवाना दिला गेला आहे की नाही याची व त्यांना योग्य प्रमाणपत्र देऊन मासेमारी करु देण्याची खात्री घेण्याची जबाबदारी त्या देशाची आहे. अशा देशांनी त्यांच्या हद्दीबाहेर जाऊन मासेमारी करणा-या जहाजांची विस्तृत नोंद करुन ठेवावी.




मासेमारीसाठी ज्या देशांमध्ये जहाजांना चिन्हे (निशाणी) दिली जातात अशा देशांनी आपली मासेमारी करणारी जहाजे सुरक्षित आहेत याची खात्री करुन घ्यावी आणि त्यांचे विमापत्र उपलब्ध करुन घ्यावे. त्याचप्रमाणे मासेमारी जहाजे व यंत्र सामुग्री वर राष्ट्रीय तसेच अंतरराष्ट्रीय नियमाप्रमाणे योग्य ते चिन्ह (निशाण) असावे. कोणत्याही प्रकारच्या दुर्घटने संबंधीची सूचना संबंधित परराष्ट्रांना आणि परराष्ट्रीय सरकारला दिली गेली पाहिजे.

## बंदर असलेले देश

बंदरे असलेल्या देशांनी आपल्या बंदरात दूस-या देशांची जहाजे येत नाहीत ना, यावर लक्ष ठेवावे. परंतु आणीबाणीच्या परिस्थितीत त्यांना आपल्या बंदरात प्रवेश करण्याची परवानगी दयावी व असे करताना हे पहावे की त्यांनी आपली जबाबदारी

लक्षात घेऊन मासेमारी केली आहे की नाही. बंदर असलेल्या देशांनी अशा देशांना सहकार्य करावे जेथे जहाजे (चिन्ह देणा-या देशांकडून) रजिस्टर केले गेलेले असतील. तसेच फ्लॅग कंट्रीसच्या (चिन्ह देणा-या देशांच्या) विनंती वरुन अशा जहाजांकडून नियमांचे उल्लंघन झाले आहे का, याचे निरीक्षण करण्यास सहयोग दयावा.

बंदर आणि मासे उतरवण्याची जागा, आश्रयस्थाने मासेमारीच्या जहाजांसाठी सुरक्षित असावीत. जहाजांच्या दुरुस्ती साठी, मासे विक्रेत्यांसाठी व मासे खरेदी करणा-यांसाठी या जागांमध्ये योग्य त्या सुविधा असाव्यात. या बरोबरच गोडया पाण्याचा पुरवठा, स्वच्छता व्यवस्था आणि कच-याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था असावी.



## जलकृषीचा विकास


लोकांना खाण्यासाठी लागणा-या माशांच्या पुरवठयात वाढ करताना मत्स्य शेतीतील माशांचा अनियंत्रित माशांच्या संख्येवर कमीत कमी वाईट परिणाम होईल आणि आनुवंशिक विविधतेचे रक्षण होईल हाच जलकृषी विकासाचा प्राथमिक उद्देश आहे.

पाणी, खाडी किंवा किनारपट्टीचा उपयोग नेहमी एकापेक्षा जास्त उपभोक्त्यांकडून केला जातो. अशा साधनांच्या उपयोगाचा अनेक उपभोक्त्यांमध्ये होणारा मतभेद टाळला जावा व त्यांचा योग्य रितीने विनिमय व्हावा म्हणून देशांनी काही नियम व योजना तयार कराव्यात.

जलकृषीचा विकास करताना, त्या देशांनी हे निश्चित केले पाहिजे की त्याचा परिणामात्मक प्रभाव तेथील क्षेत्रीय समुदायावर, उत्पादकतेवर तसेच मासे पालनाच्या ठिकाणांवर होणार नाही व त्यासाठी त्यांनी पाउले उचलावीत. जलकृषीवर होणा-या पर्यावरणीय प्रभावाचे विश्लेषण आणि त्याचे रक्षण करण्यासाठी सोय केली जावी. त्याचबरोबर नैसर्गिक स्वरुपात पाळल्या जाणा-या माशांच्या आहाराची व खाद्य

प्रकारांची काळजी घेतली जावी. पर्यावरणावर वाईट परिणाम होऊ नये म्हणून माशांच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यास वापरात येणा-या औषधांचा किंवा रसायनांचा कमी प्रमाणात उपयोग करावा. याबरोबरच जलकृषी उत्पादनाचा दर्जा व सुरक्षा कायम ठेवणे देखील महत्वाचे आहे.

माशांच्या विदेशी जातींचे पालन करताना, त्यांना पाण्यात सोडण्यापूर्वी आणि जलसीमे बाहेर त्यांचा विस्तार करण्यापूर्वी आपल्या शेजारील देशांशी संपर्क साधावा व त्यासाठी त्यांची संमती घ्यावी. माशांच्या नवीन जातींपासून होणारे रोग कमी करण्यासाठी त्या देशांनी या संहितेचे पालन करुन सहमति दर्शवावी. त्याचप्रमाणे एखादया भागातील जलीय वनस्पति आणि प्राणी दूरवरच्या भागात नेण्यासाठी देखील, या संहितेचे पालन करावे. जलकृषी व तांत्रिकेच्या विकास योजना आखताना देशानी व औद्योगिक समुहांनी नैसर्गिक रित्या लोप पावत चाललेल्या मत्स्य जातींच्या साठवणीकडे आणि पुरवठा वाढीकडे लक्ष दयावे.




## किना-यावरील मात्स्यिकी क्षेत्र व्यवस्थापनेचे एकत्रीकरण

किनारपट्टीवरील कोणत्याही संसाधनाचा, उदाहरणार्थ पाणी, भूमि इत्यादिंचा उपयोग व उपलब्धता करताना तेथे राहणा-या मच्छिमार समुदायाचा विचार करुन योजना तयार कराव्यात व अशा योजना तयार करताना यात त्यांचे मत देखील विचारात घ्यावे.

ज्या ठिकाणी किनारपट्टीचा विविध कारणांसाठी उपयोग केला जातो, तेथे मच्छिमार समाज व इतर सामाजिक घटक यांचे आपसातील मतभेद टाळून मत्स्य व्यवसाय सुरु ठेवला पाहिजे आणि उद्भवलेले मतभेद निर्विवादरित्या स्पष्टपणे सोडवले गेले पाहिजेत. त्याचप्रमाणे त्या देशांनी आपल्या शेजारील देशांची मदत घेऊन किना-यावरील संसाधनंचे योग्य प्रकारे संरक्षण आणि व्यवस्था करण्याचा निश्चय केला पाहिजे.

# हंगामानंतरच्या काळातील कार्य व व्यापाराची जबाबदारी



देशांतील जनतेला मासे खाण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि हेही लक्षात घ्यावे की माशांबरोबरच माशांपासून तयार केलेली उत्पादने सुरक्षित व स्वास्थ्यवर्धक आहेत. ग्राहकांच्या स्वास्थ्याच्या रक्षणासाठी आणि ग्राहकांची फसवणूक (उदाहरणार्थ विक्रीसाठी ठेवलेल्या माशांबद्दल ग्राहकांना चुकीची माहिती पुरवणे) टाळण्यासाठी, सरकारने माशांच्या गुणवत्तेच्या स्तराचे निरीक्षण करावे. यापुढे जाऊन देशांनी एकत्रीतपणे स्वच्छतेचे उपाय स्थापित करण्यासाठी आणि प्रमाणपत्रित करण्यासाठी सहकार्य करावे.

पर्यावरणीय दृष्टीकोनातून माशांची प्रक्रिया विधी, वाहतूक आणि साठवणूक चांगली असावी. (या पद्धतीचा पर्यावरणावर दुष्परिणाम होऊ देऊ नये). मासे पकडल्यानंतर होणारा व्यय आणि मासे परिसंस्करना दरम्यान होणारे टाकावू पदार्थ कमी केले गेले पाहिजेत, पकडलेल्या माशांचा (मच्छिमारांना नको असलेले मासे पकडले गेले असले तरी जास्तीत जास्त उपयोग केला गेला पाहिजे आणि माशांच्या प्रक्रियेसाठी उपयोगात आणलेल्या पाणी, ऊर्जा आणि खासकरुन लाकूड यांचे व्यवस्थापन काळजीपूर्वक केले गेले पाहिजे. शक्य असल्यास जास्त महत्वाच्या उत्पादनांना किंवा प्रक्रीया केल्या गेलेल्या उत्पादनानां प्रोत्साहित केले पाहिजे, कारण अशी उत्पादने मच्छिमारांना नेहमी जास्त पैसा मिळवून देतात.

मत्स्य व मत्स्य उत्पादनांशी संबंधित व्यापारी कायदे, सरळ, स्पष्ट व अंतरराष्ट्रीय नियमानुसार असावेत. प्रत्येक देशाने ठराविक कालावधीमध्ये मच्छिमार, पर्यावरणविषयक संघटना आणि ग्राहक संघांशी सल्ला मसलत करुन त्यांच्या व्यापारी कायदे व अधिनियमांची समीक्षा करावी. जर काही देशांच्या कायदे आणि अधिनियमामध्ये विकास किंवा बदल झाला तर त्यांनी इतर देशांना देखील त्याची सूचना दयावी आणि आयात निर्यातीच्या व्यवस्थेत आवश्यक बदल करुन त्यांना लागू करुन घेण्यासाठी वेळ दयावा.

हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे की आंतरराष्ट्रीय स्तरावर नैसर्गिकरित्या कमी होत चाललेल्या (ज्यांची मोठया प्रमाणात मासेमारी झालेली आहे अशा जातींचे) माशांचा व्यापार होत नाही व अशा लुप्त जातींचे संरक्षण व आंतरराष्ट्रीय व्यापार नियमन करारांची अंमलबजावणीचे निरीक्षण करण्यात हे देश सहकार्य करतील जेणेकरुन अशा मासे आणिं मत्स्य उत्पादनाच्या व्यापारामुळे माशांचे संरक्षण आणि प्रमाणित उपयोगांना धोका उत्पन्न होणार नाही.

## मात्स्यिकी संशोधन

देशांनी हे जाणून घ्यावे की जबाबदारीपूर्ण मात्स्यिकी योजनेला उत्तम शास्त्रीय आधार आवश्यक आहे. यासाठी त्या देशांनी शोधकार्यात सुविधा निर्माण करुन दयाव्यात आणि तांत्रिक कार्य करणा-या तरुणांना प्रशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. अंतरराष्ट्रीय संघटनांनी अशा देशांमध्ये तांत्रिक शोध कार्य करण्यास मदत केली पाहिजे व अल्प विकसित आणि विकसनशील छोटया द्विपीय देशांच्या गरजांवर अधिक लक्ष पुरविले पाहिजे.

शोध कार्यासाठी देशांनी मासे आणि त्यांच्या जन्मस्थानांच्या स्थितीवर देखरेख ठेवावी आणि त्या स्थितीत होणा-या कोणत्याही बदलांवर लक्ष ठेवावे. सामान्य पर्यावरणावर आणि वेगवेगळया प्रकारच्या मासेमारी यंत्रांचा विशिष्ट माशांच्या संख्येवर होणा-या परिणामांची तपशिलवार माहिती एकत्र करावी. जेव्हा एखादा देश मासेमारीसाठी नवीन यंत्राचा किंवा तंत्राचा सामाजिक आणि व्यापारिक कारणांसाठी बाजारात आणण्याची योजना आखतो, तेव्हा हे संशोधन खास करुन महत्वाचे आहे.

मासेमारी करणा-या देशांनी, अंतरराष्ट्रीय शोध कार्यात एकत्रीत यावे. ज्या ठिकाणी अन्य देशांच्या जलसीमे मध्ये शोध कार्य करत आहेत, अशा ठिकाणाच्या संशोधन करणा-या लोकांनी त्या देशाद्वारे स्थानानुसार नेमून दिलेले मासेमारीच्या नियमांचे पालन केले पाहिजे. मासेमारी आणि त्याला सहायक शास्त्रीय माहिती नेहमी मासेमारी करणा-या संघटनांना पुरवली पाहिजे आणि संबंधित देशांमध्ये शक्य तितक्या लवकर वितरित केली पाहिजे.


## क्षेत्रीय व अंतरराष्ट्रीय सहयोग

हे अतिशय स्पष्ट आहे की क्षेत्रीय मासेमारी संघटनांनी आणि देशांनी, सर्व बाबींमध्ये सहकार्य केले पाहिजे. खास करुन समान माशांचे संचय करताना, एखादया

देशांनी दूस-या देशांतील मासे संचयनाच्या व्यवस्थापनाचे उपाय आपल्या व्यवस्थापनेशी अनुरुप आहेत की नाहीत हे पहावे व त्या अनुरुपाने त्याचा स्वीकार करावा.

याशिवाय मासेमारी संबंधीच्या वादविवादात सामिल, संबंधित देशांनी क्षेत्रीय संस्थांची मदत घेऊन, त्यातील मदभेद दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परंतु जर काही प्रकारांचा विवाद पुनः उत्पन्न होत असेल तर त्याचा लवकरात लवकर शांतीपूर्वक उपाय केला गेला पाहिजे.

क्षेत्रीय मत्स्य संघटनांनी संरक्षण, व्यवस्थापन आणि संशोधनांवर होणारा खर्च त्यांच्या सदस्यांकडून भरुन काढण्याचे ध्येय ठेवावे. याबरोबरच स्थानीय मासेमारी संघटनेच्या प्रतिनिधिंनी क्षेत्रीय मत्स्य संघटनेच्या कार्यात भाग घ्यावयास आपल्या प्रतिनिधिंना परवानगी दयावी.



## या सर्वांचा अर्थ काय ?


पुनः उत्पन्न होणा-या नैसर्गिक संसाधनानुसार, जर देशांकडे संसाधनाविषयीची उत्तम योजना असतील आणि जर जबाबदारीपूर्ण व सदुपयोगाचे अनुकरण केले तर देश वर्षानुवर्षे माशांचे उत्पन्न घेऊ शकतो. याचप्रमाणे जलकृषीबरोबरच असे मत्स्य पालन की, ज्यापासून पर्यावरणावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही, हे विकसित केले जावे, कारण या प्रकारच्या मत्स्य पालनाने त्याच्याशी संबंधित समुदायाची सामाजिक

व आर्थिक स्थिती आणि त्यांच्या देशाची अर्थ व्यवस्था मजबूत करण्यास महत्वाची मदत मिळेल.

जर जबाबदारीपूर्ण मासेमारीसाठी अशी आचार संहिता यशस्वी रीत्या लागू केली गेली तर आणि ज्यात मासेमारीशी आणि जलकृषीशी निगडीत सर्व लोक असतील तर, वर्तमानात आणि भविष्यात येणा-या पिढीसाठी मासे आणि त्यापासून तयार होणा-या उत्पादनांचा संचय उपलब्ध होईल अशी अपेक्षा ठेवता येईल. खरे तर वर्तमान पिढीचे हे नैतिक कर्तव्य आहे की त्यांनी वर्तमान काळात उपलब्ध संसाधनाचा बेजबाबदारीने मोठया प्रमाणात वापर करुन पुढील पिढीसाठी उपलब्ध असलेला माशांचा पुरवठा कमी करु नये.

जबाबदारीयुक्त मात्स्यिकीसाठी ही आचारसंहिता सर्व देश आणि जनता यांना उद्‌युक्त करते की त्यांनी व्यापक व एकत्रीकरण योजनांना अमलांत आणून मात्स्यिकी क्षेत्राला यापेक्षा अधिक बळकट आणि स्थिर बनवावे, जेणेकरुन दूरवरच्या काळासाठी अशा जबाबदारीपूर्ण प्रक्रियेचा मत्स्य संचयनाच्या प्रक्रियेत अधिक चांगला परिणाम होईल. यामुळे अन्न सुरक्षित ठेवण्यास योग्य मदत होईल आणि त्यापासून नियमित पैसा देखील प्राप्त होईल.

जर जगातील सर्व देश एकत्र येऊन मात्स्यिकीसाठी जबाबदारीने कार्यरत राहतील तर येणा-या अनेक पिढींसाठी भरपूर प्रमाणात माशांचा पुरवठा मिळू शकेल. या पुस्तिकेला सूचनात्मक समजून जागतिक मात्स्यिकी आणि जलकृषीच्या विकासात व व्यवस्थापनेत आपण आपली भूमिका उत्कृष्टपणे निभावून न्याल अशी आशा अन्न व कृषी संघटनेचा मात्स्यिकी विभाग बाळगतो.



जबाबदारीपूर्ण मासेमारीची आचारसंहिता या अतांत्रिक पुस्तकामध्ये महत्वाच्या माहितींचा उल्लेख केला आहे. या संहितेचा उद्‌देश ध्येयाच्या प्राप्तीसाठी मोठ्या प्रमाणावर जागरुकता निर्माण करणे आणि सर्व प्रग्रहण मासेमारी आणि जलीय संवर्धनाचे क्षेत्र वाढविणे हा आहे. ही पुस्तिका आचार संहितेची जागा तर घेऊ शकत नाही. परंतु कठिन माहितीला सोप्या भाषेमध्ये या संहितेच्या अंतर्गत असे प्रस्तुत करायचे आहे की मासेमारीच्या क्षेत्रामध्ये सर्व गरजू लोकांना ही माहिती सोप्या रुपात मिळू शकेल.